आर.सी.सी.क्र.८४/२०२०
सरकार वि.सतिश डुमणे
निशाणी क्र.३७

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक—१**

नाव :— **अमृत मुनिराज डुमणे**
वय :— ३६ वर्षे, व्यवसाय:— शेती
राहणार :— सायखेड, ता.धर्माबाद, जि.नांदेड.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.ए.ए.शिखरे यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

१. मी आरोपींना ओळखतो कारण ते माझे नातेवाईक आहेत. आमच्यामध्ये शेताच्या कारणावरुन ब—याच वर्षापासून वाद आहे. निर्मला डुमणे माझी पत्नी आहे. दिनांक ३१.०७.२०२० रोजी मी माझे सायखेड येथील गट क्र. ८२ मध्ये सकाळी १०.०० वाजत गाय बांधुन कामानिमित्त दुस—या शेतात मजुरीसाठी गेलो. दुपारी २.०० ते ३.०० वाजताच्या सुमारास माझी पत्नी निर्मला गायीला पाणी पाजण्यासाठी शेतात गेली. त्यावेळी आरोपी क्र. १ ने तिचा हात पकडून गाय शेतात कशी काय बांधली या कारणावरुन झटापटी केली. ती तिच्या हाताला झटका देवून घरी परत आली. मी घरी आल्यावर झालेली घटना मला अंदाजे दुपारी ३.३० वाजता सांगितली. त्यावेळी मी घरी आलो होतो.

२. त्यानंतर मी व पत्नी आरोपी क्र. १ च्या घरी जावून माझे पत्नी सोबत असे का केले असे विचारण्यासाठी गेलो असता आरोपी सतिश, देविदास, सुप्रिया, गंगासागर, दिक्षा आणि पुजा यांनी आम्हाला मारहाण केली. सतिशने मला काठीने डोक्यावर मारले त्यामुळे माझे डोके फुटुन रक्त आले. ईतर आरोपींनी आम्हाला लाथाबुक्याने मारहाण केली. त्यानंतर सुप्रिया, पुजा आणि दिक्षा यांनी निर्मलाचे केस धरुन ओढले. त्यांनी आम्हाला जीवाने मारुन टाकतो अशी धमकी दिली. या सर्व प्रकरणामुळे आम्ही घाबरलो होतो. त्यावेळी राजेद्र लोलापोड आणि व्यंकट कोडलु यांनी आमची सोडवासोडव केली. त्यानंतर आम्ही तेथून धर्माबाद पोलीस ठाण्यात आलो. पोलीसांनी आम्हा दोघाना उपचारासाठी सरकारी दवाखाना, धर्माबाद येथे पाठविले. डॉक्टरांनी माझे जखमेवर टाके लावले आणि मलमपट्टी केली. त्यानंतर पोलीस स्टेशनला येवून तक्रार दिली. आता मला मुळ तक्रार आणि छापील एफ.आय.आर. दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. **मुळ तक्रारीस नि. ३८ अणि छापील एफ.आय.आर. ला नि.क्र .३९** देण्यात आला. ज्या काठीने मला मारहाण करण्यात आली ती दाखविल्यास मी ओळखु शकतो.

आरोपी व त्यांच्या वकीलांचा पुकार केला असता दुपारी १.३० वाजेपर्यत गैरहजर अभिलेखावर कोणताही अर्ज नाही. आरोपी दुपारी १.५५ मिनिटाने हजर झाला मौखिक विनंतीवरुन उलट तपास पुढील तारखेपर्यंत रुपये १५०/—च्या साक्षीभत्या वर तहकुब

करण्यात येतो.

**फेर तपास नाही.**

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृती

स्वाक्षरीत/—

**( एस. ए. हरणे )**

दिनांकः—०९.०१.२०२३.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.